# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/12/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत १८ किमी. अंतरावर मौजा भवानी माता मंदीर जवळ मोहपा दिनांक १७/१२/२०२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. शकुंतला अजय सिंग, वय ३८ वर्ष, रा. भवानी माता मंदीर जवळ मोहपा, ता. कळमेश्वर व आरोपी नामे– सदाशिव काशीनाथ ढोबळे, वय ४७ वर्ष, रा. नवीन वस्ती मोहपा ता. कळमेश्वर यांचे घर एकमेकांचे घराजवळ असुन आरोपीची पत्नी ५ वर्षापुर्वी त्याला सोडुन गेल्याने त्याचे घरी आरोपी व त्याचा मुलगा राहत असल्याने घर कामासाठी कोरोना काळात आरोपीचे मुलाने फिर्यादीला १००० रू. महिन्याने धुनी भांडी, स्वयंपाक करण्यास ठेवले असल्याने फिर्यादी ही आरोपीचे घरी जात होती. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी ही आपले घरी हजर असतांना बाथरूम मध्ये यातील फिर्यादीला एकटी घरात पाहुन घरात घुसुन म्हटले की ''तु माझे सोबत रिलेशनशिप ठेवत का नाही'' असे म्हटले असता त्यावर फिर्यादीने नाही म्हटले असता आरोपीने फिर्यादीस ''मी तुला मारतो आणि मी सुध्दा मरतो'' असे म्हणुन आरोपीने फिर्यादीचा गळा दाबला आणि त्याने त्याच्या खिशातुन एक काळया रंगाची फिनाइलची शिशी काढुन फिर्यादीचे तोंडात फिनाइल पाजुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केला व आरोपीने स्वत: फिनाइल पिल्याने पुढील वैद्यकीय उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ४५२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर